नियमीत दिवाणी दावा क्र.६६५/२०२२
वसंत वि. शासन
वादीतर्फे सा.क्र.३ (नि.क्र.५५)

**शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नांव:- मन्मथ लक्ष्मणराव तेजीबंद,वय:-४८** वर्षे,

**व्यवसाय:-** नोकरी, **रा.लोहा, जि.नांदेड**.

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.बी.फड यांच्यामार्फत सुरु.**

**१.** उपअधिक्षक भूमीअभिलेख कार्यालय, अहमदपूर येथे मी भूकरमापक म्हणून कार्यरत आहे. दाव्याचे समन्स माझ्या वरिष्ठांना मिळालेले आहे. वरिष्ठांच्या आदेशाने मी आज साक्षीला आलो आहे. मौजे किनगांव येथील स.क्र.१५४ चे रेकार्ड आजरोजी मी आणलेले आहे. सदरचे रेकार्ड स.क्र.१५४ च्या पोटहिश्शांबद्दल आहे. स.क्र.१५४ चे मुळ पोटहिस्से १ ते ८ पर्यंत आहेत. मुळ स.क्र.१५४ याचे इंग्रजी ए ते जी या आद्याक्षरांप्रमाणे पोटहिस्से होते. पोटहिस्सा मोजणीप्रमाणे स.क्र.१५४/ए ते १५४/जी यांचे १५४/१ ते १५४/८ असे पोटहिस्से तयार झाले. स.क्र.१५४/१ याचे क्षेत्र ७ एकर १६ गुंठे होते. पोटहिस्सा मोजणीनंतर ते ७ एकर १४ गुंठे झाले. स.क्र.१५४/५ याचे क्षेत्र २ एकर ३६ गुंठे आहे. त्याचा पोटहिस्सा मोजणीनंतर ते क्षेत्र तेवढेच राहिले. १५४/१ ते १५४/८ या पोटहिश्श्यांचे आजतागायत पुढे पोटहिस्से पडलेले नाहीत. आमच्या कार्यालयामार्फतच एखाद्या हिश्शांचे पोटहिस्से करण्याचे काम केले जाते. आमच्या खेरीज अन्य कोणत्याही महसुली अधिकाऱ्याला पोटहिस्से तयार करायचा अधिकार नाही. आम्ही पोटहिस्से तयार केल्यानंतर त्याची ७/१२ उताऱ्यासदरी नोंद व्हावी व ७/१२ उतारा अद्ययावत व्हावा म्हणून पोटहिश्शांचे रेकार्ड तहसीलदारांकडे पाठवून देतो. नमुना नं.४ ची एक प्रत आम्ही त्यांना पाठवतो. नमुना नं.४ उताऱ्यात जूना स.क्रमांक व त्याचे क्षेत्र आणि त्याच्यामध्ये तयार झालेले पोटहिस्से आणि त्यांचे क्षेत्र यांचा लिखीत उल्लेख असतो. या उल्लेखाप्रमाणे महसुली अधिकाऱ्यांनी ७/१२ उताऱ्यास अंमल देणे आवश्यक असते. कोणत्याही परिस्थितीत आम्ही पाठविलेल्या नमूना नं.४ च्या तक्त्यामध्ये किंवा त्याच्या दिलेल्या अंमलामध्ये बदल करता येत नाही. तसा बदल झाला असल्यास तो अवैध आहे. याकामी नि.क्र.४२ मध्ये दर्शविलेले प्रतिवादी क्र.४ ते ७ यांचे क्षेत्र ३ हेक्टर ४६ आर दाखवलेले आहे. ते आमच्या रेकार्डच्या विपरीत असल्याने अयोग्य आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुध्द दावा विना कैफीयत चालविण्यात आल्यामुळे उलटतपास नाही.</u>**

**<u>प्रतिवादी क्र.४ ते ७ विरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आल्यामुळे उलटतपास नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक:३०/०७/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.